Literacy for a Billion

Movie: Chavhata
Year: 1984

Song: Ho Vedi Khuli
Lyricist: Jagdish Khebudkar

हो वेडी खुळी
ही प्रीत मला
हो कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
अबोल मी झाले तरी लाज बोलते
अबोल मी झाले तरी लाज बोलते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते

माझ्यावानी अल्लड नव्हती ही
माझ्यावानी अल्लड नव्हती
गाणं भुंग्याचं कमळा भवती
गाणं भुंग्याचं कमळा भवती
वाऱ्यासंग कळी कशी रंग खेळते
लाज बोलते
कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
अबोल मी झाले तरी लाज बोलते
अबोल मी झाले तरी लाज बोलते

वेल झाडाला बिलगून बसली
वेल झाडाला बिलगून बसली
पाय वाटेची हिरवळ हसली
पाय वाटेची हिरवळ हसली
माझ्यात मी दंग अशी धुंद चालते
लाज बोलते
कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
अबोल मी झाले तरी लाज बोलते
अबोल मी झाले तरी लाज बोलते

ओढ भेटीची मनात राहिना
ओढ भेटीची मनात राहिना
कसं सांगू मी ओठात येईना
कसं सांगू मी ओठात येईना
सपन हे माझं त्याला मीच भाळते
लाज बोलते
कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
वेडी खुळी प्रीत मला कोड घालते
अबोल मी झाले तरी लाज बोलते
अबोल मी झाले तरी लाज बोलते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*